अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक : अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. ०३ एप्रिल २०२५ | वर्ष १० वे | अंक ३४ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## कोलारीवासियांची एसडीपीओ कार्यालयावर धडक

### अमित तुपटेच्या संशयास्पद मृत्यूची चौकशीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील शेवटच्या टोकावर वसलेल्या कोलारी गावातील शेतशिवारातील विहीरीत मृतदेह आढळून आला. सदर मृतदेह गावातील अमित विश्वनाथ तुपटे याचा असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, सदर प्रकाराला आत्महत्येचे स्वरूप देण्यात आले. मृतक अमित तुपटेच्या भावाला जीवे मारण्याची धमकी, शवविच्छेदन अहवालातील गुदमरून मृत्यू, विहीरीतील कमी पाण्याची पातळी, व संशयीत आरोपींचे अरेरावी पणांचे वागणे, पोलिस पाटलांची मृतकाच्या भावाला बयाण न देण्यासंदर्भातील धमकी यामुळे मृतक अमित तुपटेची आत्महत्या नसून हत्या केली आहे, असा आरोप नातेवाईकांनी पत्रपरिषदेत केला. नातेवाईकांनी मृतकाला न्याय मिळण्याचा पवित्रा उचलल्यानंतर गावातील शेकडो नागरिकांनी एसडीपीओ कार्यालयासमोर धडक देत मृतक अमित तुपटेच्या संशयास्पद मृत्युची चौकशी करण्याची मागणी उचलून धरली.



(एसडीपीओ कार्यालयासमोरील कोलारीवासिय, इन्सेटमध्ये मृतक अमित)

कोलारी येथील रहिवासी असलेला मृतक अमित विश्वनाथ तुपटे हा २८ फेब्रुवारी २०२५ पासून बेपत्ता झाला होता. दुसऱ्या दिवशी कुटूंबीयांकडून अमित बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. शेतशिवार, विहीरी, नदी व गावात सर्वत्र शोध घेतला असता, तो आढळून आला नाही. दि. ०६ मार्च २०२५ रोजी त्याचा मृतदेह गावातील शेतशिवारातील विहीरीत आढळून आला. मृतक अमितची आत्महत्या नसून प्रेमप्रकरणातून त्याची हत्या करण्यात आली असल्याचा आरोप मृतकाचा भाऊ राकेश विश्वनाथ तुपटे, गावच्या सरपंच कांचन सोमेश्वर तुपटे व सोमेश्वर तुपटे यांच्यासह इतर गावकरी तथा कुटूंबीयांनी पत्रपरिषदेत केला. मृतकाचे प्रेत ज्या विहीरीत सापडले, तेथील पाण्याची पातळी अगदी नगण्य होती, विहीरी लगतच्या शेतात गहू पिकाची खुदवड झालेली होती. घटनास्थळावर दुचाकीचे अवशेष पडलेले होते. विहीरी जवळील तणसीच्या ढिगाऱ्यातून मृतदेह कुजल्याची दुर्गंधी येत होती.

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## "घिबली आर्ट"ची नेटकऱ्यांना भुरळ, तज्ञांकडून चिंता व्यक्त

### चॅट जिपीटीवरून फोटो बनविण्याचा नवा ट्रेंड



ब्रम्हपुरी/का.प्र.

इंटरनेटवर आणि सोशल मीडियावर ॲनिमेटेड फोटोचा ट्रेंड सुरू आहे. सध्या सोशल मीडियावर घिबली ट्रेंडची जादू पसरलेली आहे. जिथे पहावं तिथे लोक या घिबली स्टाईलमध्ये त्यांचे फोटो तयार करत आहेत. याद्वारे युजर्स आपले नॉर्मल फोटो स्टुडिओ घिबलीच्या सुंदर ॲनिमेशन स्टाईलमध्ये बदलू शकतात. अनेक जण ओपन एआयच्या चॅटजीपीटी आणि एक्स वरील ग्रोक प्लॅटफॉर्मच्या मदतीनं फोटो बनवून सोशल मीडियावर शेअर करत आहेत. हा ट्रेंड नेटकऱ्यांकडून फॉलो केला जात आहे. सर्वच क्षेत्रातील दिग्गज देखील या ट्रेंडमध्ये सहभागी होत फोटो शेअर करीत आहेत.

स्टुडिओ घिबली हे एक इमेज जनरेशन टूल आहे. चॅट जीपीटीच्या या वैशिष्ट्याद्वारे, युजर्स त्यांचा कोणताही आवडता फोटो, चित्रपटातील फोटो किंवा कोणत्याही लोकप्रिय मीमला स्टुडिओ घिबलीच्या फोटोमध्ये रूपांतरित करू शकतात. नुकतेच ओपन एआयने चॅट जीपीटी प्लस, प्रो आणि टीम वापरकर्त्यांसाठी इमेज जनरेशन फीचर लॉंच केलं आहे, ज्यामुळे इंटरनेटवर नवीन ट्रेंड सुरू झाला आहे, ज्यामध्ये तुम्ही तुमचे खरे फोटो जपानच्या प्रसिद्ध स्टुडिओ घिबलीच्या ॲनिमेटेड स्टाईलमध्ये करू शकता. घिब्ली कला म्हणजे स्टुडिओ घिब्लीच्या अनोख्या शैलीतील छायाचित्रे आहेत. ज्यामध्ये पेस्टल आणि म्यूट कलर पॅलेट आणि गुंतागुंतीच्या तपशीलांचा वापर केलेला असतो.

घिबली हा जपानमधील सर्वात मोठा ॲनिमेशन स्टुडिओ आहे. या स्टुडिओची स्थापना हायाओ मियाजाकी, इसाको ताकाहाता तोशियो सुझुकी यांनी १९८५ मध्ये केली होती. घिबली स्टुडिओनं बनवलेल्या अनेक चित्रपटांना ऑस्कर पुरस्कार मिळाले आहेत. या स्टुडिओचे चित्रपट नेटफ्लिक्स वर आहेत. ॲनिमेशन जगातील बादशाह अशी ओळख मियाजाजाकी अशी आहे.

**डिजिटल प्रायव्हसीसंदर्भात तज्ज्ञांनी केली चिंता व्यक्त :**

डिजिटल प्रायव्हसीसंदर्भात ओपन एआय च्या घिबली एआय आर्ट जनरेटरबद्दल तज्ज्ञांनी चिंता व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, एआय प्रशिक्षणासाठी हजारो पर्सनल फोटोंमध्ये प्रवेश करण्याचा हा डाव असू शकतो. हा ट्रेंड व्हायरल झाला आहे, परंतु तज्ज्ञांचं असं मत आहे की, युजर्स नकळतपणे ओपन एआय ला डेटा देत आहे आणि यामुळे त्यांची प्रायव्हसी धोक्यात येऊ शकते. कंपनीला वेब-स्क्रॅप केलेल्या डेटावरील कायदेशीर निर्बंध डावलून युजर्स स्वेच्छेने सबमिट केलेले फोटो मिळविण्यास अनुमती देते. जिडीपीआर नियमांनुसार,ओपन एआय ला इंटरनेटवरून फोटो स्क्रॅप

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# धरणीकंपाचे धडे

साऱ्या विश्वावर ताबा मिळविल्याच्या आविर्भावात वावरणाऱ्या मानवाचा वृथा अभिमान, म्यानमार आणि थायलंडमधील ७.७ रिश्टर तीव्रतेच्या विनाशकारी भूकंपाने एका फटक्यात मातीमोल केला आहे. म्यानमारच्या मंडाले शहराजवळ केंद्रबिंदू असलेल्या या भूकंपाचे धक्के बांगलादेश, चीन, तैवान यांसह भारताच्या काही भागांमध्येही जाणवले. एकट्या म्यानमारमध्ये या दुर्घटनेत दीड हजारांहून अधिक बळी गेले असून, ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. भूकंपासारख्या आपत्तीला सामोरे जाण्याची योग्य तयारी असती, तर ही हानी कमी होऊ शकली असती. म्यानमारमधील विनाशाची तीव्रताही अधिक आहे. तेथील मंडालेसह थायलंडमधील बैंकॉक परिसरातही उंच इमारती पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्याची दृश्ये समाज माध्यमांतून सर्वांपर्यंत पोहोचली आहेत. ही दृश्ये मनाचा थरकाप उडविणारी आहेत. या भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीमध्ये दहा किलोमीटरवर, म्हणजे तुलनेने उथळ असल्याने धक्क्यांना अवरोध कमी झाला आणि भूकंपाची तीव्रता वाढली; तर थायलंडचे भौगोलिक स्थान आणि मऊ माती अशा रचनेमुळे तेथे इमारती कोसळल्या. या दुर्घटनेचा म्यानमारच्या अर्थव्यवस्थेला प्रचंड फटका बसला असून, ती मूळ पदावर येण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आणि जगाच्या मदतीची गरज भासणार आहे.

गेल्या काही काळात विज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली, आणि भूकंप कोठे व कोणत्या वेळी होणार, याबाबत ढोबळ संकेत मिळत असले, तरी अचूक अंदाज देणारे तंत्रज्ञान अद्याप पूर्णपणे विकसित झालेले नाही. जपान, कॅलिफोर्नियासारख्या भागांमध्ये वारंवार भूकंप होत असल्याने तेथे खबरदारीची संस्कृती विकसित झाली आहे; मात्र म्यानमार, थायलंड आदी देश तीव्र भूकंपप्रवण क्षेत्रात मोडत नाहीत. त्यामुळे दोन्हीकडे दुर्घटनेची तीव्रता कमीतकमी व्हावी, याबाबत तयारी नव्हती. 'थायलंडमधील हानी ही त्याचे भौगोलिक स्थान व रचनेमुळे झाली; तर म्यानमारमधील हानी चुकीचे नियोजन आणि विकासाची अयोग्य धोरणे यामुळे झाली,' या संयुक्त राष्ट्रसंघाच्या निरीक्षणात नक्कीच तथ्य आहे. पाच वर्षांपूर्वी म्यानमारमध्ये 'नॅशनल बिल्डिंग कोड' लागू करण्यात आला. मात्र, गरिबी, अस्थिर सरकार अशा कारणांमुळे त्याची काटेकोर अंमलबजावणी झालेली नाही. भूकंपरोधक इमारतींसाठी तंत्रज्ञान जगभरात उपलब्ध असले, तरी जपानसारख्या विकसित देशांमध्ये त्याचा वापर परवडतो आणि जीव वाचविण्यास सर्वाधिक प्राधान्य असल्याने उपाययोजनाही होतात. तुलनेत गरीब–विकसनशील देशांमध्ये अशा दुर्घटना आणि त्या रोखण्यासाठी साधनसंपत्ती यांचा मेळ घालावा लागतो. परिणामी, येथे जीवितहानी अधिक होते. विशेषतः काही शहरांमध्ये विकासाचे केंद्रीकरण होते, साहजिकच तेथील लोकसंख्या वाढते व थोडक्या क्षेत्रफळात अधिक लोकसंख्येला सामावून घेणाऱ्या गगनचुंबी इमारती उभ्या राहतात. या पार्श्वभूमीवर या भूकंपामुळे, उंच इमारतींद्वारे होणाऱ्या वाढीबाबत सुयोग्य धोरण आणि खबरदारी, सध्याच्या शहरीकरणाच्या प्रतिमनाचा आढावा आणि शहरांचा विस्तार, भूकंपरोधक वास्तुशैलीचा स्वीकार आणि संतुलित विकेंद्रित विकास या दृष्टीने नियोजनाचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे.

या आपत्तीकाळात भारताने शेजारधर्माला जागून मदतीचा हात पुढे केला आहे. भूज, किल्लारी, उत्तराखंड आणि काश्मीरसारख्या भागात झालेल्या विनाशकारी भूकंपांचा अनुभव आपल्या देशाने याआधी घेतलेला आहे. तेथील बचावकार्य आणि पुनर्वसनाचा अनुभव भारतीय यंत्रणांना असल्याने आता दुर्घटनेनंतर ही मदत नक्कीच मोलाची ठरेल. मात्र, शेजारील देशातील या दुर्घटनेमधून भारतासह साऱ्या जगाने घेण्याजोगे काही धडे आहेत. आपल्याकडेही अनेक प्रदेश भूकंपप्रवण असून, तेथे भूकंपरोधक बांधकामांबाबतचे धोरण अधिक सजगतेने राबविणे आवश्यक आहे. ही बांधकामे सर्वसामान्यांच्या आवाक्यात येण्यासाठी तंत्रज्ञांनी आणि सरकारनेही विशेष प्रयत्न करायला हवेत. शाळा, सभागृहे आणि सार्वजनिक इमारतींपासून याची सुरुवात करता येईल. भूकंपाने होणारी वित्तहानी रोखणे मानवाच्या हाती फारसे नसले, तरी जीवितहानी कमीतकमी होईल, अशी धोरणे व त्यांची कटाक्षाने अंमलबजावणी करण्याकडे सरकारला लक्ष द्यावे लागेल. मानवी जीवाचे मोल सर्वोच्च असते, हे मनोमन स्वीकारले, तर हे सहजशक्य आहे.

# ने.हि. महाविद्यालयाच्या समीक्षा पंडीतचा राज्यस्तरीय युवा संसद स्पर्धेत सहभाग

ब्रह्मपुरी/का.प्र.

केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय भारत सरकार उच्च व तंत्र शिक्षण विभाग,




राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय मुंबई व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'विकसित भारत युवा संसद २०२५' चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय येथील समीक्षा प्रकाश पंडित (एम.ए.प्रथम वर्ष भूगोल) हिने उल्लेखनीय यश मिळवले. या आधारे तिची निवड 'राज्यस्तरीय युवा स्पर्धे'साठी करण्यात आली होती.

युवा पिढीला सक्षम करणे आणि त्यांना राष्ट्रीय आणि जागतिक समस्यावर चर्चा व वादविवाद करण्यासाठी प्रोत्साहन देणे, तसेच राष्ट्र उभारणीत त्यांची भूमिका वाढवणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. 'एक देश एक निवडणूक' या विषयावर ही वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. यात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत समीक्षा पंडित हिने हिरीरीने सहभाग नोंदविला, तिच्या या स्पष्ट विचारशक्ती व प्रखर वाणीने तिची २६ मार्चला विधान भवन, मुंबई येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली. तेथे जाऊन तिने आपले स्पष्ट विचार मांडून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

समीक्षाच्या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी तिचे भरभरुन अभिनंदन केले. तिच्या या यशाकरिता प्राचार्य डॉ. डी. एच. गहाणे, उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पदमाकर वानखडे, डॉ. दर्शना उराडे यांच्यासह महाविद्यालयातील सांस्कृतिक समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शांतीनगर येथे महिला आरोग्य तपासणी शिबीर संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथील सम्यक बौद्ध विहार नगरात बहुजन वैद्यकीय सेवा मंच व ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी च्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिनाच्या औचित्याने शांतीनगर येथील सम्यक बौद्ध विहारात महिला आरोग्य विशेष कॅन्सर रोगनिदान तपासणी शिबिराचे एक दिवसीय यशस्वी आयोजन करण्यात आले.

दिनांक २७ मार्च २०२५ रोजी दिवसभर पार पडलेल्या या शिबिरात तपासणी समुपदेशक अंजिरा आंबीलडोके ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी यांच्या नेतृत्वात रक्त तपासणी सहकारी अधिकारी सोनाली पानसे, वर्षा सरकार यांच्याकडून महिलांना होणारे स्तन कॅन्सर, गर्भाशयाचा कॅन्सर, तोंडाचा कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर, थायराइड टेस्ट, सीबीसी टेस्ट, लिपिड प्रोफाइल इत्यादी विविध चाचण्यांसाठी रक्त घेऊन तपासणी लॅबमध्ये पाठविण्यात आले.

यामध्ये एकूण ४५ स्त्री पुरुष रुग्णांनी तपासणी शिबिरात रक्त तपासले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. पूनम घोनमोडे यांच्या नेतृत्वात शांती नगरातील सम्यक बौद्ध विहार महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले.

## विनोदिनी

केवळ विनोद म्हणून वाचू नका,
पुणेरी शब्दरचना मन कसं हेलावून टाकते बघा.....
वडील मुलाला खुप शिकवून, नोकरीला लावतात..
त्या मुलाचं नाव...
' वैभव गजानन केळकर '
कालांतराने मुलगा टुमदार घर विकत घेतो..
घराच्या दारावर तो नेम प्लेट लावतो...
'वैभव केळकर '
शेजारचे रानडे काका घरी येतात, आणि मुलाचं कौतुक करत म्हणतात...
वा.. छान.... बापाचं नाव काढलंस की पोरा..!

दुकानाचे गाडे विकणे आहे
सिनेमा टॉकीज चौक, मार्केट रोड,
डॉ. आघाडे यांच्या दवाखान्याजवळ, नागभीड
संपर्क : 9764026807, 7972683511

# अऱ्हेरनवरगांव शेतशिवारात पट्टेदार वाघाचे दर्शन

## परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील अऱ्हेरनवरगांव, भालेश्वर ही गावे वैनगंगा नदी किनारी वसलेली आहेत. या भागात उन्हाळी धान पीकाची लागवड केली असून या शेतशिवारात पट्टेदार वाघाचे दर्शन काही शेतकऱ्यांना झाले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाघाचे दर्शन झालेल्या शेतकऱ्यांनी आरडाओरड केल्यामुळे मोटार पंप सुरू करणारे, औषधी फवारणी करणारे ,खत मारणाऱ्या शेतकऱ्यांनी आपली हातची कामे जशीच्या तशी टाकून शेतामधून पळ काढला. वाघ आला रे आला अशी बोंब गावात पसरताच गावकऱ्यांनी वाघ ज्या धानाच्या शेतात बसून आहे त्या दिशेने धाव घेतली आणि त्याला पाहण्यासाठी गर्दी केली.

अऱ्हेरनवरगांव शेतशिवारात वाघ आला याची माहिती ब्रह्मपुरी येथील वनविभागाला देण्यात आली असता वनविभाग अधिकारी सेमस्कर व सैय्यद आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये म्हणून ते वाघावर बारीक लक्ष ठेवून आहेत. अऱ्हेरनवरगांव व आजूबाजूचा परिसर हा जंगल व्याप्त नसूनसुद्धा मागील वर्षीपासून जनतेला पट्टेदार व बिबट वाघाचे दर्शन घडत आहे.

# ब्रम्हपुरी येथे महिला व बाल रुग्णालयाला मंजूरी मिळणार

## सार्व. आरोग्य मंत्र्यांची विधानसभेत ग्वाही

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथे नवीन महिला व बाल रुग्णालय धोरणानुसार प्रस्तावित आहे. हे रुग्णालय मंजूर करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य समीर कुणावार यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी योगेश सागर, विक्रम पाचपुते, बाळा नर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री आबिटकर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी प्रस्तावित बाल रुग्णालय आणि श्रीगोंदा शहरात १०० खाटांचे रुग्णालय यासंदर्भात आराखडा तयार असून, हा विषय प्राधान्याने सोडविण्यात येणार आहे.

# घरगुती गृहउद्योग करून आर्थिक सक्षम व्हा

## - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

'वर्तमान काळातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना शिक्षणामुळे नोकरी मिळेलच अशी



आशा ठेवावी. पण त्याच बरोबर जर नोकरी मिळाली नाही तर पारंपारिक गृह उद्योग आणि व्यवसायात सहकार्य करून आपले पुढील आयुष्य सुखकर करण्यासाठी प्रयत्न करावे,' असे आवाहन श्री. श्रावणजी बगमारे शिक्षण संस्था ब्रम्हपुरी द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख जुनिअर कॉलेज ब्रम्हपुरी येथे व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमानिमित्त संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा प्रकाशजी बगमारे यांनी केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन करण्यासाठी सेवानिवृत्त प्रा. दिलीप जुमडे हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी स्वत:च्या अनुभवातून शून्यातून कसे आपले कार्य पुढे नेता येईल याचा लेखाजोखा विद्यार्थिनींच्या समोर मांडला. अलीकडच्या काळात अनेक गृह उद्योग घरच्या घरी करण्याचे आहेत. वस्तू तयार करून त्याचे योग्य मार्केटिंग केलं तर आपली आर्थिक गरज निश्चितपणे भागविता येऊ शकते आणि आपल्या पायावर उभे होता येते. नोकरीच्या मागे लागून राहणे योग्य आहे पण काही कालावधीनंतर जर नोकरी मिळाली नाही तर जीवनचरितार्थ चालविण्यासाठी छोट्या-मोठ्या गृह उद्योगाची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. याची सुरुवात शालेय काळापासूनच आपण करावी असे अनेक उदाहरणाद्वारे प्रा. दिलीप जुमडे यांनी विशद केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या शारदाताई ठाकरे, प्रा. सुभाषचंद्र खोब्रागडे, प्रा. हेमलता बगमारे, गोवर्धन दोनाडकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुभाषचंद्र खोब्रागडे यांनी तर उपस्थित मान्यवर व विद्यार्थिनी यांचे आभार गोवर्धन दोनाडकर यांनी मानले. प्रसंगी प्रत्येक आठवड्यात एक दिवस शाळाबाह्य उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचा उपक्रम डॉ. पंजाबराव देशमुख गर्ल्स ज्युनिअर कॉलेजने अविरत चालवावा, अशी सूचना संस्था अध्यक्ष प्रा. प्रकाशजी बगमारे यांनी केली.

# महाराष्ट्र विद्यालयाची 'शर्वरी' नवोदय विद्यालय परिक्षेत उत्तीर्ण



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळगाव (भोसले) द्वारा संचालित महाराष्ट्र विद्यालय, पिंपळगांव (भोसले) येथील वर्ग ५ ची विद्यार्थिनी कु. शर्वरी दिगांबर उरकुडे हिची चंद्रपूर जिल्ह्यातील तळोधी (बाळापुर) येथील जवाहर नवोदय विद्यालय वर्ग ६ करिता नुकत्याच घोषित झालेल्या निकालात पात्र ठरली आहे.

महाराष्ट्र विद्यालय, पिंपळगाव (भोसले) च्या वतीने मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे यांनी व शिक्षकांनी तिचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि तिच्या पुढील वाटचालीस मंगलमय शुभेच्छा दिल्या. शर्वरीने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील तथा मार्गदर्शक शिक्षक व शाळेतील सर्व शिक्षकांना दिले.

नियमित वाचा.. अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# चकबोथली येथे समता सैनिक दलाचा वर्धापन दिन साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना वाहून घेतलेल्या समता सैनिक दलाचा वर्धापन दिन चकबोथली येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विहार मेश्राम यांनी मोलाचे मार्गदर्शन करत समता सैनिक दलाच्या ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश टाकला.



समता सैनिक दलाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यानंतर उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

समता सैनिक दल ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आली होती. सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने कार्य करणाऱ्या या संस्थेने स्वातंत्र्यलढ्यात आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यावेळी कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून विहार मेश्राम यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, 'समता सैनिक दल ही केवळ एक संस्था नाही, तर सामाजिक न्यायाच्या लढाईतील एक सशक्त चळवळ आहे. आजच्या तरुणांनी समतेच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक परिवर्तनात सक्रीय सहभाग घ्यायला हवा.' कार्यक्रमाला उपस्थित मातेरे सर यांनी सुद्धा मोलाचे मार्गदर्शन केले. या वर्धापन दिन सोहळ्यात गावातील नागरिक, युवक, महिला तसेच सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांनी या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी या कार्यक्रमाचे कौतुक करत समता सैनिक दलाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

# बेरोजगारीवर मात करीत डोर्लीच्या 'प्रवेश'ची मेकॅनिक व्यवसायात भरारी

## संसाराच्या गाडीला गॅरेजचा आधार: बेरोजगार युवकांसाठी प्रेरणादायी

ब्रम्हपुरी/का.प्र.

हारण्याची पर्वा कधी केली नाही, जिंकण्याचा मोह केला नाही पण नशिबात असेल मिळेल म्हणूनही अपेक्षा न बाळगता प्रयत्न आणि मेहनत करणे सोडले नाही. याच मंत्राची गाठ बांधुन बेरोजगारीवर मात करीत उभारला ट्रक्टर गॅरेजचा व्यवसाय.



ब्रम्हपुरी तालुक्यात दक्षिणेस दुर्गम जंगलव्याप्त भागात डोर्ली गावं आहे. वैनगंगा नदीकाठावर वसलेल्या या गावाची जेमतेम ६० घरांची वस्ती. गावाची लोकसंख्या अंदाजे ४०० आहे. याच गावातील गिरिधर ठाकरे व इंदुबाई ठाकरे या आईवडीलांच्या पोटी प्रवेश हा सन १९९२ मध्ये जन्माला आला. घरची परिस्थिती बेताचीच अशा परिस्थितीत प्रवेशचे प्राथमिक शिक्षण डोर्ली गावातच झाले तर माध्यमिक शिक्षण आवळगांव येथे झाले. यानंतर १२वी पर्यंतचे शिक्षण गांगलवाडी येथे पुर्ण केले व नंतर आयटीआय यामध्ये ड्रायव्हर कम मेकॅनिक हा कोर्स आरमोरी, गडचिरोली येथुन पुर्ण केला. आयटीआय कोर्स पुर्ण केल्यानंतर प्रवेशने आरमोरी व ब्रम्हपुरी येथील अनेक मोटर गॅरेजमध्ये काम केले. येथे काम करीत असताना विना मोबदला प्रवेशने कामाचा अनुभव घेतला. त्यानंतर प्रवेशने आपल्या कामाच्या अनुभवाच्या जोरावर सन २०१४ मध्ये गांगलवाडी येथे श्री मोटर गॅरेजची मुहुर्तमेढ रोवली.

मृदभाषी, कामात तत्परता, गुणवत्तापूर्ण काम या अनेक गोष्टींनी प्रवेशने टॅक्टर मालकांच्या मनात 'प्रवेश' केला. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रवेशच्या जीवनात यशाने प्रवेश करून प्रवेशची आर्थिक बाजु सावरली. सध्याच्या परिस्थितीत प्रवेशच्या गॅरेजमध्ये ३० ते ३५ किमी अंतरावरील टॅक्टर मालक आपली टॅक्टर दुरूस्तीसाठी याच गॅरेजला प्राधान्य देतात. त्यामुळे बेरोजगारीवर मात करीत प्रवेश या व्यवसायात प्रवेश करून आर्थिक नफा मिळवीत लोकांना गॅरेजमध्ये व घरपोच सेवा देत आहे.

# ने.हि. महाविद्यालयात लघु उद्योगावर व्याख्यान

ब्रम्हपुरी/का.प्र.

ने. हि. महाविघालय ब्रम्हपुरी येथील गृहअर्थशास्त्र विभागात बुधवार, दि.




२७/०३/२०२५ ला व्याख्यान व फॅशन डिझायनिंग कोर्सचे प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे सर उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य प्रा. केला सर, शांताबाई भैय्या महिला महाविद्यालयाच्या प्रभारी प्रा.डॉ. हर्षा कानफाडे, उपप्राचार्य डॉ. शेकोकर सर, तसेच कला शाखा विभाग प्रमुख डॉ. डांगे सर यांचेसह प्रमुख वक्ता प्रा. स्मिता कुडवे (समता फाऊंडेषन, फॅशन डिझायनींग प्रशिक्षक)उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. सोनाली पारधी यांनी केले. शारदास्तवन व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

प्रमुख वक्ता प्रा. स्मिता कुडवे यांनी ''ज्ञानाकडून उद्योगाकडे'' या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, आपल्या कामात आवड, संयम खूप महत्त्वाचा असतो. आपले काम सुंदर कसे करता येईल आणि ग्राहकांचे समाधान कसे करता येईल यावर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे, असा मौल्यवान संदेश त्यांनी विद्यार्थिनींना दिला. यावेळी फॅशन डिझायनिंग केर्स पूर्ण केलेल्या विदयाथीनींना सर्टिफिकेट वितरीत करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनानंतर विदयार्थीनींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन कु. निकीता राऊत तर आभार प्रदर्शन कु. मयुरी मेंढे हीने केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा.डॉ. सोनाली पारधी, प्रा.डॉ अनिता बगमारे, प्रा. शितल पांचाळ यांचे मार्गदर्शनात बी. ए. प्रथम, द्वितीय व एम.ए. प्रथम वर्षाच्या विदयाथीनींनी परिश्रम घेतले.

# साई मंदिरात ५ एप्रिलपासून साई उत्सव

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील विद्यानगर स्थित साई देवस्थान येथे दि. ५ ते ७ एप्रिल दरम्यान श्री साई उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

०५ एप्रिल ला दुपारी ४ वाजता साई देवस्थान पासून श्री च्या पालखीची मिरवणूक शहरातील मुख्य मार्गांवरून काढण्यात येणार आहे. तर ०६ एप्रिलला साई देवस्थान येथे सकाळी १० वाजतापासून रामजन्माच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ०७ एप्रिल ला दुपारी २ वाजता ह. भ. प. सविताताई खरवडे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित असून त्यानंतर काल्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ६ ते ९ दरम्यान मंदिर परिसरात महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री साई देवस्थानचे अध्यक्ष नंदू पिसे, सचिव महेश पिलारे, पिंटू समर्थ, ऋषिजी चुन्हे, शरद ठेंगरी, पराग कुंभारे, मनोज हेमके, नितेश समर्थ, प्रमोद बांगरे, राहुल हेमके, मामाजी वझाडे, नितीन ब्राम्हणकर, श्रुत कुंभारे, साहिल नाकतोडे यांनी केले आहे.

# मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा वर्धापन दिन



ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य मागसवर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने ४७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शनिवार दिनांक २९ मार्च रोजी सकाळी ब्रह्मपुरी विभागात विभागीय कार्यालय ब्रम्हपुरी प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संघटनेचे गडचिरोली प्रविभागीय अध्यक्ष एल.आय. थाटकर साहेब, प्रविभागीय उपाध्यक्ष आर. मेश्राम साहेब, प्रविभागीय सचिव एस. चौधरी, प्रविभागीय सहसचिव नितीन वाघमारे, प्रविभागीय कोषध्यक्ष बी. टी. बोरकर, प्रविभागीय संघटक विजय दिवटे, माजी प्रविभागीय सचिव तथा मार्गदर्शक जे. पी. मेश्राम, गडचिरोली विभागीय सचिव डी. डी.नन्नावरे, गड., विभागीय सहसचिव उपेंद्र तावाडे ब्रम्हपुरी, विभागीय अध्यक्ष विकास सेलोटे, विभागीय सचिव केतुल नवघडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंतीचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रपिता महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बहुजन विचार मंच ब्रम्हपूरी द्वारा झांसी राणी चौक राजर्षी शाहू महाराज विचार परिसरात साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्य दि. १२ एप्रीलला जाहिर व्याख्यान कार्यक्रम आयोजित केले असुन बहुजन समाजाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय अध:पतनाची कारणे व त्या वरील उपाय या विषयावर प्रसिद्ध विद्रोही विचारवंत गोविंददादा पोलाड, अकोला यांचे व्याख्यान होणार असुन वर्तमान मिडीयाने निर्माण केलेल्या चंगळवादी वृत्तीमुळे बहुजनांचे वैचारीक होत असलेले खच्चीकरण या विषयावर प्रसिद्ध सत्यशोधक विचारवंत डॉ. अभिलाशा गावतुरे (बेहरे) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. संजय वाळके फुले शाहु आंबेडकरी विचारवंत ब्रम्हपूरी हे राहणार आहेत. या परिसंवादाचे उद्घाटक जगदिश पिलारे अध्यक्ष शिवछत्रपती फाउंडेशन ब्रम्हपूरी तथा डॉ. शिशिर वंजारी डायरेक्टर हार्टकेअर हॉस्पीटल ब्रम्हपूरी हे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हनुन प्रा. डॉ. राकेश तलमले सचिव रयत शिक्षण संस्था ब्रम्हपूरी तथा इंजि. राजेश मेश्राम उप कार्यकारी अभियंता महावितरण ब्रम्हपूरी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे. दिनांक १३ एप्रील २०२५ ला संगितमय कार्यक्रमाचे आयोजन असुन वादळ निळ्या क्रांतिकारकांचे हा संगितमय कार्यक्रम महाराष्ट्राचे प्रसिद्ध प्रबोधनकार लोमहर्ष कावळे सादर करणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटनिय सत्राचे अध्यक्ष संजय मगर संचालक स्टडी सर्कल अकॅडमी हे राहणार आहेत. उद्घाटक प्रा. देवेश कांबळे सचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रम्हपूरी हे उपस्थित राहणार आहेत. सदर दोन्ही दिवस वैचारिक प्रबोधन सादर होणार असुन दि. १४ एप्रीलला शिस्तबद्ध पणे रॅली काढुन अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजक बहुजन विचार मंचद्वारे केले आहे.

# ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा दणदणीत विजय

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था व्यवस्थापन समितीच्या निवडणूकीत बहुजन विकास आघाडी पॅनलने एकतर्फी विजय मिळवत सत्ता हस्तगत केली आहे. या निवडणुकीत एकूण ११ जागांपैकी बहुजन विकास आघाडीने १० जागांवर दणदणीत विजय मिळवत समोरील पॅनलचा धुव्वा उडवला.

ही निवडणूक अनिल दोनाडकर यांच्या नेतृत्वाखाली लढवण्यात आली होती. या निवडणुकीत ७०० मतदारांपैकी ५१७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. बहुजन विकास आघाडीने अंगठी या चिन्हावर निवडणूक लढवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. विशेषतः ग्रामीण भागातील मतदारांनी या पॅनलला मोठ्या प्रमाणावर पसंती दर्शवली.

या निवडणुकीत बहुजन विकास आघाडी पॅनलचे सर्वसाधारण गटातून अनिल दोनाडकर, डाकराम दोनाडकर, डॉ. पारेश्वर सेलोकर, अशोक ठेंगरी, अरविंद आंबोरकर, उषा तलमले, सुरेखा बालपांडे, इतर मागास प्रवर्ग गटातून नानाजी तुपट, अनुसूचित जाती जमाती गटातून अल्का ढवळे, विमुक्त जाती व भटक्या जमाती गटातून सुखदेव सोनटक्के विजयी ठरले.

# प्रा. राजेंद्र राचलवार यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रा. राजेंद्र राचलवार, हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती निरोप समारंभ रविवार (दि.३०) ला पार पडला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे हे उपस्थित होते. डॉ. डायगव्हाणे यांनी प्रा. राचलवार यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. त्यांनी आपल्या मनोगतात प्रा. राचलवार हे संस्थेचे आधारस्तंभ असून, त्यांनी आपल्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत अनेक विद्यार्थी घडविले, असे प्रतिपादन केले. यावेळी शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर येथील प्रा. दुलारी गाढवे, प्रा. रामटेके यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

******

# ने.हि. महाविद्यालयात जागतिक जलदिन साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे भूगोल पदवी व




पदव्युत्तर विभागामध्ये नुकताच 'जागतिक जलदिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ.आर. के. डांगे, भूगोल विभागप्रमुख यांनी, 'जल संवर्धन एक काळाची गरज' यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ.एस.एम.शेकोकर, शारीरीक शिक्षण विभागप्रमुख यांनी 'पाण्याची उपलब्धता व जलाचे महत्व' यावर विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. डॉ.किशोर नाकतोडे यांनी जागतिक जल दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. डॉ. आशिष साखरकरांनी, जल हे जीवन आहे या विषयावर भाष्य केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.डी.एच. गहाणेंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'जागतिक जल दिनाची आवश्यकता का?' यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

'जागतिक जलदिन' या कार्यक्रमाचे संचालन डॉ. योगीता कारनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. श्रीकान्त पिसे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर.के. डांगे, डॉ. आशिष साखरकर, डॉ. प्रतिभा कढव, डॉ. योगीता कार, एम. आर. हटवार तसेच पदवी व पदव्युत्तर विभागाचे सर्व विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...
थोड्याच अवधीनंतर
ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper
प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता : गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी
: जाहिरातींसाठी संपर्क : महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३१५

... QUOTES ...

"If you think that something is wrong with you and you believe in a higher power, then you'd have to believe that the higher power makes mistakes. Do you." - Teal Swan

चा रो ळी

एकदा तुला डोळेभरून एकटक पाहिले
आता तसे पाहण्याची हिम्मत होत नाही...
नेत्रतज्ञ म्हणाले, 'नंबर खुपच वाढला',
वारंवार नवा चष्मा मला परवडत नाही...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# अनिता लांबे यांचे 'चरैवेति' विषयावर प्रेरणादायी भाषण

ब्रह्मपुरी/का.प्र.

नव संवत्सराच्या शुभारंभाने कार्यपथावर अविरत वाटचाल 'चरैवेति, चरैवेति' हा मंत्र कार्यकर्त्यांसाठी केवळ एक विचार



नाही, तर त्यांची जीवनपद्धती असली पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्र सेविका समिति च्या विदर्भ प्रांत धार्मिक विभाग प्रमुख अनिता लांबे यांनी वर्ष प्रतिपदा उत्सवात केले.

त्यांनी आपल्या उद्बोधनात संस्कृतीचा सातत्यशील प्रवाह, संघटनात्मक कार्याची वाटचाल आणि भविष्यातील दिशा या मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

ऐतरेय उपनिषदातील 'चरैवेति' हा मूलमंत्र म्हणजेच निरंतर गतिशीलता दर्शवतो. निसर्गातील सूर्य, चंद्र, ऋतू कधीही थांबत नाहीत, तसेच कार्यकर्ता देखील आपल्या ध्येयाकडे अविरत वाटचाल करायला हवी. त्या म्हणाल्या की, वं. मावशी आणि वं. ताईंनी एका छोट्या शाखेपासून सुरु केलेल्या कार्याचा आज विविध आयामांत विस्तार झाला आहे. आणीबाणीतील संघर्ष, कोरोना काळातील सेवा कार्य आणि प्रत्येक प्रांतात निर्माण झालेली संघटनात्मक ताकद यामुळे समितिची कार्यव्याप्ती मोठ्या प्रमाणात विस्तारली आहे.

संघटन कार्य हे केवळ एका पिढीचे नसून, अनेक पिढ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा परिणाम आहे. नदी जशी आपल्या उगमापासून समुद्रापर्यंत वेगवेगळे रूप घेत पुढे प्रवाहित होत राहते, पण तिचे प्रवाहत्व, शुद्धता आणि लोककल्याणाची भावना कायम राहते, तसेच संघटनेनेही युगानुकूल बदल स्वीकारून ध्येयाकडे वाटचाल करावी. 'तेजस्वी हिंदू राष्ट्र निर्माण' हे आपले अंतिम ध्येय असून, बदलत्या काळातील आव्हाने पेलत आणि मूल्यांशी प्रामाणिक राहून कार्यरत राहणे हीच खरी सेवा आहे. असे आव्हान त्यांनी सेविकांना केले.

यांप्रसंगी विदर्भ प्रांत धार्मिक विभाग प्रमुख अनिता लांबे यांनी जिल्हा व नगर कार्यकारीणीतील दायित्व बदलाची घोषणा केली. संस्कृत श्लोक अपर्णा पाठक, अमृत वचन कु. देवयानी पाठक , प्रास्ताविक व परिचय ममता भट आणि वैयक्तिक गीत कु.आर्या परांडे यांनी सादर केले.

# ब्रम्हपुरी शहरात जे.जे. मल्टीस्पेशालिटी क्लिनिकचा शुभारंभ

## प्रसिध्द उद्योजक व प्रथम नगराध्यक्ष अशोक भैया यांचे हस्ते उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

एज्युकेशन व मेडिकल हब म्हणून प्रसिद्धीस आलेल्या ब्रह्मपुरी शहरात नव्याने सुरू होत असलेल्या जे जे मेडिकल्स व मल्टीस्पेशालिटी क्लिनिकचे उद्घाटन दि. ३० मार्चला पार पडले. सदर क्लिनिक व मेडिकलचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योगपती व ब्रह्मपुरी नगर परिषदेचे प्रथम नगराध्यक्ष तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी प्राचार्य देविदासजी जगनाडे, डॉ. अरविंद नाकाडे, गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सांख्यिकीय अधिकारी कामेश्वरजी तलमले, लाखनी येथील सुप्रसिद्ध डेंटिस्ट डॉ. सारंग निर्वाण, व डॉ. मंजिरी निर्वाण (जेंगठे) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



नागपूर रोडवरील जेंगठे कॉम्पस मध्ये सदर क्लिनिक व मेडिकल्सची सुरुवात होत असून जॉबलेस ग्रोथच्या कसोटीच्या काळात सुशिक्षित तरुणांना रोजगारासाठी मदत मिळावी म्हणून शैक्षणिक क्षेत्रानंतर आर्थिक व वैद्यकीय क्षेत्रात प्रा. जेंगठे सरांनी सुरू केलेल्या उपक्रमाचा हा भाग असल्याचे अशोक शेंडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. तसेच अभ्यासिकेतून ३० विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी, स्वबळावर उभे केलेले पाच विद्यार्थी, तालुका स्तरावर निर्माण केलेल्या तीन नागरी पतसंस्थामधून शेकडो लोकांना अर्थसहाय्य व नव्या पतसंस्था निर्मितीचे काम असे विविध प्रयोग सदर उपक्रमाचाच भाग असल्याचे सांगितले. खरेतर मुठभर स्वार्थी भ्रष्ट लोकांमुळे सहकार क्षेत्र बदनाम झाले असले तरी देशाला सहकाराशिवाय पर्याय नसल्याने याच माध्यमातून बेरोजगार तरुणांना उद्योजक बनविण्याचा सरांचा मानस असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला.

विशेष म्हणजे मागील ५० वर्षापासुन शेकडो स्थानिक लोकांना कायम रोजगार देत असलेले उद्योगपती अशोक भैय्या विदर्भातील प्रमुख रोजगार निर्माते बनले असुन सामाजिक कार्यकर्त्यांची साथ मिळाल्यास ब्रह्मपुरीला एक उद्योगी जिल्हा व विदर्भातील सर्वात मोठे रोजगार निर्मिती केंद्र बनविण्याचा व हजारो स्थानिक तरुणांना रोजगार देण्याचा निर्धार आपल्या उद्घाटनपर भाषणात व्यक्त केला. पण यासाठी राजकीय नव्हे तर सामाजिक कार्यकर्त्यांनी नेतृत्व करण्याची पूर्वअट सांगितली. तसेच स्किलबेस शिक्षण देणारे खाजगी विद्यापीठ निर्माण करुन रोजगार निर्मिती सहज शक्य होईल असे सांगितले. विशेष म्हणजे प्रा. जेंगठे सरांच्या शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील भरीव कार्याची स्तुती करून प्रतिकसारख्या होतकरु तरुणाने सुरू केलेले मेडिकल व क्लिनिक सर्वसामान्य रुग्णांना वरदान ठरेल असा विश्वास व्यक्त केला..याप्रसंगी नागपुरातील सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची चमू बोलावून परिसरातील जनतेला सर्वोत्कृष्ट सेवा देण्याचा प्रतिक कोहळे यांनी निर्धार व्यक्त केला.

सदर कार्यक्रमात प्राचार्य शाम झाडे, प्राचार्य गिरीधरराव लडके, डॉ. सुशील चुर्हे, डॉ. पंकज लडके, डॉ. नुपूर लडके, डॉ. श्रीकांत कावळे, डॉ. समीर नाकाडे, डॉ. अतुल परशुरामकर, विनय लंजे, राजेश प्रधान, मोहीत रायपुरे, प्रा. विजय मुडे, प्रा. शेखर बन्नोरे, प्रा. मोहन वाडेकर, प्राचार्य नकटुजी सोनुले, विजय मोहुर्ले, टिकाराम शेंडे, प्रा. सोनुले, हरिश्चंद्र चोले, मारोती कोहळे, दिलीप भुरले, संदिप भुरले, ईश्वर कोहळे, श्रीनिवास कोहळे, किशोर कोठारे, दिलीप सातपुते, गोविंदा बुरांडे आदी शेकडो नागरिक सहभागी होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक अशोक शेंडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल मोहुर्ले यांनी केले.

## कोलारीवासियांची एसडीपीओ...

(पान क्र. १ वरून)

त्यामुळे मृतदेह तणसीच्या ढिगाऱ्यात लपविले असावे, नंतर विहीरीत फेकले असावे, तसेच घटनास्थळ विहीरीजवळील तणसीचा ढिगारा पेटवून देण्यात आला, त्यामुळे मृतकाची हत्या करून आत्महत्येचा बनाव करण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. सदर माहिती पोलिसांना कळवून देखील संशयाच्या आधारावर संशयीतांची साधी चौकशी करण्याचे धाडस पोलिसांनी दाखविले नसल्याचा आरोप कुटूंबीयांनी पत्रपरिषदेत केला.

मृतकाच्या भावाला गावातील तीन लोकांनी ११ व १४ मार्च रोजी जीवे मारण्याची धमकी दिली तसेच मारहाण करण्याचा प्रयत्न केला. सोबतच पोलिस पाटील यांनी संशयीतांची घेतलेली बाजू व अन्यायग्रस्तांना वाचा बंद ठेवण्यासाठी दिलेली धमकी हे सुद्धा संशयाच्या भोवऱ्यात आहे. सदर प्रकरणात घातपात झाल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पूर्न शवविच्छेदन व निष्पक्ष चौकशी करून मृतकाच्या कुटूंबीयांना न्याय देण्याची मागणी मृतकाचे भाऊ राजेश विश्वनाथ तुपटे,सरपंच कांचन सोमेश्वर तुपटे व पती सोमेश्वर तुपटे यांनी पत्रकार परिषदेत केली. नातेवाईकांनी मृतकाला न्याय मिळण्याचा पवित्रा उचलल्यानंतर गावातील शेकडो नागरिकांनी एकत्र येत एसडीपीओ कार्यालयासमोर धडक देत मृतकाच्या संशयास्पद मृत्युच्या निष्पक्ष चौकशी करण्याची व पिडीत कुटूंबीयाला न्याय देण्याची मागणी उचलून धरली. यावेळी महिला पुरूषांची संख्या लक्षणीय होती.

## "घिबली आर्ट"ची...

(पान क्र. १ वरून)


करण्यासाठी 'कायदेशीर हित' योग्य ठरवावे लागेल, ज्यासाठी अतिरिक्त सुरक्षा उपायांची आवश्यकता आहे. परंतु जेव्हा युजर्स स्वतः फोटो अपलोड करतात, तेव्हा ते परवानगीही देतात, ज्यामुळे एआय ला डेटावर प्रक्रिया करण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळते.

**युजर्ससाठी नेमका धोका कोणता?** एकदा युजर्सनी आपले फोटो सबमिट केले की, त्या फोटोंच्या वापरावरील नियंत्रण सुटते, असा इशारा तज्ज्ञ देतात. एआय च्या गोपनीयता किंवा प्रायव्हसी धोरणात असे म्हटले आहे की, युजर्सच्या इनपुटचा वापर मॉडेल प्रशिक्षणासाठी केला जाऊ शकतो जोपर्यंत ते त्यातून बाहेर पडत नाहीत, परंतु याचे दीर्घकालीन परिणाम अस्पष्ट आहेत. यामुळे तज्ज्ञ अनेक धोके दाखवतात.

**घिबली आर्टचे धोके कोणते?**

**गोपनीयतेचा भंगः** युजर्सचे फोटो त्यांच्या परवानगीशिवाय विविध कारणांसाठी वापरले जाऊ शकतात. **ओळख चोरी :** फोटोंचा गैरवापर करून एखाद्याची ओळख चोरली जाऊ शकते. **डेटा सिक्युरिटी :** युजर्सची माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि हॅकिंगला बळी पडू शकते. **चुकीचा वापर :** फोटोंचा चुकीचा वापर केला जाऊ शकतो, जसे की फेक प्रोफाइल तयार करणे. ही जोखीम लक्षात घेऊन युजर्सनी आपले फोटो शेअर करण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे.


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
(पान क्र. १ वरून)
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.







बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404